## मुख्य कार्यालय, विरार
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म.**/ /
दि. २९/०५/२०२६

*प्रेस नोट*

वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत नियमीतपणे अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई सुरू आहे. दि. २९/०५/२०२६ रोजी प्रभाग समिती "ई" नालासोपारा अंतर्गत नालासोपारा - विरार लिंक रोड लगत असलेल्या शनी मंदिराच्या बाजूला असलेल्या अनधिकृत पत्राशेडच्या बांधकामावर निष्कासन कारवाई करण्यात आली. सदर पत्राशेडचे अनधिकृत बांधकाम केलेबाबत संबंधिताना विभागामार्फत यापूर्वीच विहीत मुदतीत कागदपत्रे सादर करणे बाबत नोटीस बजावण्यात आली होती. परंतू शेडचे बांधकाम करणेच्या परवानगी बाबतची कोणतीही कागदपत्रे संबधिताकडून विभागाला सादर करण्यात आली नसल्यामुळे सदरची पत्राशेड शासकीय जागेवर अनधिकृत पणे बांधली असल्याची बाब निर्दशनास आल्यामुळे त्या अनधिकृत पत्राशेडच्या बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. कारवाई करते वेळी सदर पत्राशेड मध्ये असलेल्या गायी सुरक्षितरित्या बाहेर काढून रिकाम्या केलेल्या पत्राशेडचे निष्कासन करण्यात आले. सदर कारवाई दरम्यान कोणत्याही गायीला वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यवाहीमुळे दुखापत झालेली नाही.